महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

बुधवार ■ १३ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




## भर पावसात जिल्ह्यातील अनेक गावांत पाण्यासाठी भटकंती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राज्य सरकार व केंद्र शासनाच्या 'जलजीवन मिशन' योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात स्वच्छ, सुरक्षित पिण्याचे पाणी प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न सुरू आहे. मात्र, विविध स्थानिक अडथळ्यांमुळे योजनेची अंमलबजावणी संथ गतीने सुरू असून, महिलांना आजही डोक्यावर हंडे घेऊन मैलोनमैल पाणी आणावे लागत आहे.

ठाणे जिल्ह्यात 2019 पासून सुरू झालेल्या जलजीवन मिशन अंतर्गत 720 योजनांची कामे प्रस्तावित करण्यात आली होती. यामध्ये 420 रेट्रोफिटिंग व 300 नवीन योजनांचा समावेश आहे. एकूण 715 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. परंतु, 496 योजनांमध्ये विलंब होत असून 441 योजनांतील ठेकेदारांवर कारवाई झाल्याचे समजते.

2019 मध्ये जिल्ह्यातील ग्रामीण कुटुंबांची संख्या 2 लाख 34 हजार 612 होती. त्यावेळी 66 हजार कुटुंबांना नळजोडणी मिळाली होती. सध्याची कुटुंब संख्या वाढून 2 लाख 61 हजार 271 झाली असून, प्रशासनाच्या म्हणण्यानुसार 1 लाख 7 हजार 498 कुटुंबांना नळजोडणी देण्यात आली आहे. मात्र, अद्यापही 63 हजार 784 कुटुंबे नळजोडणीच्या प्रतिक्षेत आहेत.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी वन विभागाच्या जागा, खासगी मालकी हक्काच्या जमिनी, वीजबिलाची थकबाकी आणि पाइपलाइनसाठी जागा मिळविणे हे मोठे अडथळे ठरत आहेत. वनविभागाकडून 104 जागांपैकी फक्त 86 परवानग्या मिळाल्या, उर्वरित 18 प्रस्ताव प्रलंबित आहेत. तसेच खाजगी मालकीच्या 293 जागांपैकी 77 हरकती अजूनही सुटलेल्या नाहीत.

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी जलजीवन मिशनची अंमलबजावणी अधिक गतिमान करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीत अडचणींमुळे जिल्ह्यातील अनेक गावांतील महिलांना अद्यापही पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

## वाडा येथील पशु वैद्यकीय चिकित्सालय रखडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** वाडा पशु संवर्धन चिकित्सालय मागील वर्षभरापासून नवीन इमारतीच्या उभारणीसाठी तोडण्यात आले असून थातूरमातूर काम करून कंत्राटदार आता सुस्त झाल्याने इमारतीचे काम सध्या रखडले आहे. चिकित्सालयासह कार्यालयीन कामकाज सध्या लहानशा खोपट्यातून सुरू असून इमारतीचे काम पूर्ण होणारं कधी असा सवाल विचारला जात आहे. मार्च अखेरीस इमारतीचे काम कंत्राटदाराने हाती घेतले होते, मात्र हा केवळ निधी लाटण्यासाठी केलेला दिखावा होता का असा संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी तातडीने चौकशी करून कामाची सुरुवात करावी तसेच निकृष्ट कामाची चौकशी करावी अशी मागणी केली जात आहे.

पशू संवर्धन विभागाचे तालुका लघु पशु चिकित्सालय वाडा येथे असून इमारत जुनी झाल्याचे कारण देउन नवीन इमारत उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे. वाड्यातील एका नामांकित कंत्राटदाराला यासाठी जवळपास 4 कोटी रुपयांचा निधी मंजूर असून दवाखाना, कार्यालय व निवासस्थान असे दुमजली इमारतीचा आराखड्यात समावेश आहे. कंत्राटदाराने मात्र इमारत उभारणीत दिरंगाई केली असून जवळपास वर्षभराचा कालावधी होत आला मात्र अजून एक मजल्याचे काम पूर्ण झाले नाही.

# टिटवाळ्यात महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** अंगारकी चतुर्थीनिमित्त टिटवाळा येथील श्री सिध्दीविनायक मंदिर आणि डोंबिवलीतील महागणपतीच्या दर्शनासाठी मंगळवारी भाविकांनी अलोट गर्दी केली. टिटवाळा येथे पहाटे चार वाजल्यापासून श्री सिध्दीविनायकाचे दर्शन भाविकांसाठी खुले करण्यात आले होते.

लाखो भाविक टिटवाळ्यात सिध्दीविनायकाच्या दर्शनासाठी दाखल झाले होते. २१ वर्षानंतर श्रावण महिन्यात अंगारकी चतुर्थीचा योग आला आहे. त्यामुळे या अंगारकीला विशेष महत्व आहे. श्रावण महिन्यातील उपवास आणि त्यात अंगारकी चतुर्थी आल्याने ही पर्वणी आहे असा विचार करून राज्याच्या विविध भागातील भाविक टिटवाळ्यात सिध्दीविनायकाच्या दर्शनासाठी दाखल झाले. अतिशय शिस्तबध्द पध्दतीने रांगेतून भाविकांना दर्शनासाठी सोडले जात होते.

श्री सिध्दीविनायक मंदिर व्यवस्थापन समितीने भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून तीनशे स्वयंसेवकांचा ताफा मंदिर परिसरात, दर्शन रांगेप्रमाणे तैनात केला आहे. याशिवाय टिटवाळा पोलीस या भागात गस्त ठेऊन आहेत. मंदिर परिसरात भाविकांच्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी



होऊ नये म्हणून मंदिर परिसरातील वाहनतळ बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे भाविकांना मंदिर परिसरात खुलेपणाने फिरता येत होते. वाहनाने येणाऱ्या भाविकांना मंदिरापासून दूर अंतरावरील मोकळ्या जागा, वाहनतळ, रस्त्याच्या कडेला वाहने उभी करण्याच्या सूचना यापूर्वीच मंदिर व्यवस्थापनाने दिल्या आहेत.

सुमारे सव्वा लाखाहून अधिक भाविक दर्शनासाठी टिटवाळ्यात दाखल झाले आहेत. वाढत्या भाविकांच्या संख्येमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची काळजी पोलिसांकडून घेतली जात आहे. गर्भगृहात भाविकांना समाधाने दर्शन मिळेल अशी व्यवस्था केली होती. उन, पावसाचा खेळ सुरू असल्याने भाविक समाधान व्यक्त करत होते.

टिटवाळा रेल्वे स्थानक ते श्री सिध्दीविनायक मंदिर परिसरात वाहतुकीला अडथळा होणार नाही. कोणीही फेरीवाला रस्ता अडवून बसणार नाही यासाठी पालिकेच्या अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील या भागात नजर ठेऊन होते. संकष्टी, अंगारकी चतुर्थी असली की टिटवाळा रेल्वे स्थानक भागात फेरीवाल्यांची गर्दी असते. पण पालिकेचे फेरीवाला हटाव पथकाचे कर्मचारी या भागात तैनात असल्याने फेरीवाले गायब होते.

डोंबिवलीत श्री गणेश मंदिरात पहाटे पाच वाजल्यापासून भाविकांनी महागणपतीचे दर्शन घेण्यास सुरूवात केली. मंदिरात भाविकांना रांगेतून दर्शन घेता यावे असे नियोजन करण्यात आल्याने भाविकांना समाधानाने दर्शन घेता आले. वृध्द, ज्येष्ठ मंडळी दर्शन रांगेतून गणपतीचे दर्शन घेत होते. मंदिर व्यवस्थापनाने भाविकांची गैरसोय होणार नाही असे नियोजन केले होते.

## नवोदय विद्यालयाच्या जागेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी नवोदय विद्यालय लवकरच शहापूर तालुक्यात उभारले जाणार आहे. पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर माहीम येथील नवोदय विद्यालय पालघरमध्ये गेल्यामुळे शहापूर, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ आणि कल्याण या तालुक्यांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत




होता. या पार्श्वभूमीवर, २०२४ अखेरीस शासनाने ठाणे जिल्ह्यात नवीन नवोदय विद्यालय स्थापनेला मंजुरी दिली. आता, या विद्यालय स्थापनेच्या हालचालींना वेग आला असून जागेसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने भारत सरकारच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु करण्यात आली आहेत. या विद्यालयात प्रवेश मिळावा अशी प्रत्येक विद्यार्थ्याची इच्छा असते. जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांमधून अवघ्या काही विद्यार्थ्यांना या विद्यालयात प्रवेश मिळतो. नवोदय विद्यालय संकल्पना ही ग्रामीण भागातील प्रतिभावान विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी राबविण्यात येते. या विद्यालयात शिक्षण घेता यावे यासाठी दरवर्षी प्रत्येक जिल्यातून दहा हजार विद्यार्थी निवड चाचणी परीक्षा देतात. या परीक्षेत पहिल्या ८० विद्यार्थ्यांची निवड केली जाते.



## बारवी धरण काठोकाठ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** ठाणे जिल्ह्यातील प्रमुख पाणीपुरवठा स्रोत असलेले बारवी धरण जवळपास पूर्ण क्षमतेने भरले असून, पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने जिल्ह्याला मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार मंगळवारी दुपारी १२ वाजता बारवी धरणाची पाण्याची पातळी ७२.४० मीटरवर पोहोचली होती. म्हणजे सध्या धरणात ९७.८३ टक्के इतका पाणीसाठा आहे.

धरणाची कमाल पातळी (ओव्हरफ्लो लेव्हल) ७२.६० मीटर आहे. पावसाचे प्रमाण वाढल्याने आणि पर्जन्यवृष्टी कायम राहिल्यास, येत्या काही तासांत धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता आहे. बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यास त्याचे स्वयंचलित दरवाजे आपोआप उघडतात. त्यानंतर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू होतो.

ठाणे जिल्ह्याची तहाण भागवणारे बारवी धरण भरण्याकडे जिल्ह्याचे डोळे लागलेले असतात. नागरी वापरासह, औद्योगिक वापरासाठी बारवी धरणाचे पाणी वापरले जाते. बारवी धरणातून सोडले जाणारे पाणी पुढे आपटी बंधाऱ्याजवळून उचलून ते जांभूळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात नेले जाते. तिथे त्यावर प्रक्रिया करून जलवाहिन्यांद्वारे शहरे, उद्योगांपर्यंत पोहोचवले जाते. त्यामुळे बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरणे आवश्यक आहे. यंदाच्या वर्षात बारवी धरण मे महिन्यातच भरण्यास सुरूवात झाली. बाष्पीभवनाच्या काळात धरणात पाणी साठा होऊ लागला होता. त्यामुळे यंदाच्या वर्षात धरण लवकर भरेल अशी आशा होती.

मात्र मे, जून महिना पूर्ण कोसळल्यानंतर जुलैच्या अखेरीस पावसाने विश्रांती घेतली. त्यानंतर तो की प्रमाणात पडला. त्यामुळे बारवी धरण भरण्याचा वेग मंदावला. आता बारवी धरण क्षमतेच्या ९७.८३ टक्के इतके भरले आहे. एमआयडीसी प्रशासनाने मंगळवारी दुपारी १२ वाजता धरणाची पाणी पातळी ७२.४० पर्यंत आल्याची माहिती पत्रकाद्वारे दिली आहे. त्यामुळे पाऊस सुरू राहिल्यास धरणातून कोणत्याही क्षणी पाण्याचा विसर्ग होऊ शकतो. बारवी धरणाला स्वयंचलित दरवाजे बसवण्यात आले आहेत. त्यामुळे पाणी पूर्ण क्षमतेने आल्यास त्याचा विसर्ग आपोआप सुरू होतो. त्यामुळे मंगळवारी बारवी धरण विभागाचे कार्यकारी अभियंता दुष्यंत उईके यांनी पत्राद्वारे आसपासच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## सदाशिव सासे यांचा उपजिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाणे जिल्हा ग्रामीण चे उपजिल्हा प्रमुख सदाशिव सासे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील अंतर्गत गटबाजीला व आपआपसातील हेवेदेवे यांना कंटाळून सदाशिव सासे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याचे त्यांनी दैनिक जीवनदीप वार्ताशी बोलतान सांगितले. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात अंतर्गत गटबाजी यामुळे उफाळवून आली असून सदाशिव सासे यांच्या राजीनाम्यामुळे या पक्षातील आंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. शिवसेना उबाठा मध्ये काही दिवसापासून हुकूमशाही राजवट व वेक्तीकेंद्रित राजकारण सुरु आहे. अपमानस्पद वागणूक व जाणूनबुजून डावळणे असे प्रकार वाढत आहेत असे ही सासे यांचे म्हणने आहे.

## कुणबी समाजातील लग्न सोहळ्यातील अनिष्ट प्रथा बंद करण्याचे ठराव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा: कुणबी समाजातील लग्न सोहळ्यात काही अनिष्ट प्रथा वाढु लागल्याने लग्न सोहळे मोठ्या प्रमाणात खर्चिक होऊ लागले आहेत. काही सर्वसामान्य कुटुंबेही कर्ज काढून या अनिष्ट प्रथांचे अनुकरण करत असल्याचे दिसून येत असल्याने या अनिष्ट प्रथा बंद करण्यासंदर्भात वाडा येथे कुणबी समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांची रविवार दिनांक 10 ऑगस्ट रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला समाजातील पाचशेहुन अधिक समाजबांधव उपस्थित होते.

हजारो लोकांच्या उपस्थितीत होणारे कुणबी समाजातील लग्न सोहळे व या सोहळ्यात काही सुरु झालेल्या अनिष्ट प्रथा यावर विचार मंथन व्हावे यासाठी वाडा, विक्रमगड या दोन तालुक्यातील कुणबी बांधवांची भा वाड्यातील ब्लॉसम रिसार्ट येथे आयोजित करण्यात आली होती. मुंबई विद्यापीठाचे माजी प्रकुलगुरु डॉ. अरुण सावंत, कुणबी सेनाप्रमुख विश्वनाथ पाटील, कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष हरिभाऊ पाटील, विलास आकरे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने कुणबी बांधव उपस्थित होते.

सद्यस्थितीत होत असलेल्या कुणबी समाजातील लग्न सोहळ्यात टिळा लावणे, प्रिवेडींग, मेहेंदी कार्यक्रम, मोठ्या प्रमाणात होत असलेले मांसाहारी भोजन, दारुचे वाटप, लहानग्यांच्या मुखातून वदवून घेतली जाणारी व कुठलाच भावार्थ नसलेली मंगळाष्टके, ठराविकच मान्यवरांना फेटे बांधणे असे अनेक नवीन प्रकार या लग्न सोहळ्यात सुरु झाले आहेत. या प्रकारांमुळे लग्न सोहळ्याचा मुळ हेतू, परंपरा नामशेष होत आहेत. यावर विचार विनिमय होणे गरजेचे असल्याने व नव्याने काही सुरु झालेल्या अनिष्ट प्रथा बंद करण्यासंदर्भात या बैठकीचे आयोजन केले असल्याचे सामाजिक कार्यकर्ते नरेश आकरे यांनी सांगितले.

डॉ. अरुण सावंत, विश्वनाथ पाटील, प्रविण पाटील, मोहन पाटील, सुभाष पाटील, विलास आकरे आदी मान्यवरांनी यावेळी या अनिष्ट प्रथा बंद झाल्याच पाहिजेत असे मत व्यक्त केले. तर अनेकांनी यापुढे एक दिवसीय लग्न सोहळे आयोजित करण्याचे आवाहन केले तर काही अविवाहित तरुणांनी एक दिवसीय लग्न सोहळ्याला समर्थन देत लग्न करणार तर एकदिवसीय कार्यक्रमाच्या माध्यमातूनच करणार असल्याची यावेळी शपथ घेतली. दरम्यान कुणबी समाजात एखादी दु:खद घटना घडल्यास मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे केले जाणारे विधी किती दिवसांपर्यंत असावेत या महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

कुणबी समाजातील अनिष्ट प्रथा बंद करण्यासंदर्भात तालुका, विभाग, गावपातळीवर लवकरच समित्या स्थापन केल्या जातील अशी माहिती यावेळी संयोजकांकडून देण्यात आली.










### उल्हासनगर पालिका आयुक्तांकडून

## शहरातील गणेशोत्सव पूर्वतयारीचा आढावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज (दिनांक १२ )रोजी पालिका आयुक्त तथा प्रशासक मनिषा आव्हाळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृह, उल्हासनगर महानगरपालिका येथे सर्व संबधित अधिका-यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस अतिरिक्त आयक्त् (१) व (२), सर्व उप आयुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उल्हासनगर/मध्यवती/विठ्ठलवाडी/हिललाईन पो. स्टे, शहर बाहतूक उप शाखेचे पोलीस उप निरीक्षक, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य



विद्युत वितरण कंपनी मर्या. व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत गणेशोत्सवापूर्वी शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी, विसर्जन तलांवाची दुरुस्ती करणेसाठी शहर अभियंता यांना आदेश देण्यात आले. शहरात गणेश उत्सव साजरा करणा-या मंडळांची बैठक आयोजित करुन त्यांना शासकीय नियमांची व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांची माहिती देऊन पर्यावरणपूरक गणेश उत्सव साजरा करणेसाठी सूचना देणेकामी पर्यावरण विभागास आदेश देण्यात आले.

शासन निर्णयानुसार सहा फुटांपर्यतच्या सर्व गणेश मुर्तीचे कृत्रीम तलावात विसर्जन करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. सहा फुटांपेक्षा मोठ्या मुर्तीचे नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जन करण्यास मान्यता देण्यात आल्याचे सर्व संबधितांचे निदर्शनास आणून देण्यात आले. उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे गणेश विसर्जनासाठी खोलीलप्रमाणे कृत्रिम विसर्जन तलाव तयार करण्यात आलेले आहेत. यावेळी आयुक्तांनी जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करणेकामी सर्व संबंधित महापालिका अधिकारी व पोलीस अधिकारी यांना आदेश देण्यात आले.

### कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था

आय.डी. आय कंपनीजवळ
सेंच्युरी क्लब हाऊस
हिराघाट, बोट क्लब
संजय गांधी नगर,
जिजामाता उद्यानाजवळ
लाल चक्की चौक
कैलास कॉलनी चौक

# घरोघरी तिरंगा अभियानामध्ये ठाणे महापालिका मुख्यालयात स्वाक्षरी फलक आणि सेल्फी स्टॅण्ड

## ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्वाक्षरी करून केले उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभर सुरू असलेल्या घरोघरी तिरंगा २०२५ या अभियानाअंतर्गत ठाणे महापालिका मुख्यालय येथे तिरंगा प्रतिज्ञा स्वाक्षरी फलक आणि तिरंगा सेल्फी स्टँड उभारण्यात आला आहे. या दोन्हीचे उद्घाटन मंगळवारी सकाळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्वाक्षरी करून तसेच छायाचित्र काढून केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनीही या तिरंगा प्रतिज्ञा स्वाक्षरी फलकावर स्वाक्षरी केली.

घरोघरी तिरंगा २०२५ या अभियानात ठाणे महापालिकेतर्फे १५ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मॅरेथॉन स्पर्धेत तिरंगा प्रतिज्ञाही घेण्यात आली होती. तर, स्वच्छता अभियान, महापालिका शाळांतील विविध कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम यांचेही आयोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. महापालिका मुख्यालयातील तळमजल्यावर तिरंगा प्रतिज्ञा स्वाक्षरी फलक आणि तिरंगा सेल्फी स्टँड उभारण्यात आला आहे.तेथे सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, मनीष जोशी, उमेश बिरारी यांनीही तिरंगा फलकावर स्वाक्षरी केली. तसेच, सेल्फी स्टॅण्डपाशी छायाचित्रेही काढली. त्यांच्यासोबत उपस्थित पत्रकारांनीही तिरंगा प्रतिज्ञा स्वाक्षरी फलकावर स्वाक्षरी केल्या.




### कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि एज्युकेशन टुडे फांऊडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळेस अभूतपूर्व प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी पर्यावरण पुरक म्हणजेच शाडु मातीच्या श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी जनमानसामध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीकोनातून कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या पर्यावरण आणि प्रदुषण नियंत्रण विभागामार्फत कै.ह.भ.प.सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील कै.सुरेंद्र वाजपेयी बंदीस्त सभागृहात आज दि.12/08/2025, अंगारक चतुर्थीच्या दिवशी कल्याण-डोंबिवली परिक्षेत्रातील महापालिकेच्या शाळा, खाजगी शाळा, विनाअनुदानीत शाळांमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी शाडु मातीच्या श्री गणेश मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेस शालेय विद्यार्थ्यांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहून, अभूतपूर्व प्रतिसाद दिला. सकाळी 08.00 पासूनच डोंबिवलीतील कै.सुरेंद्र वाजपेयी बंदीस्त सभागृह चिमुकल्या मुलांच्या किलबिलाटाने भरुन गेले होते. तन्मयतेने आणि आपले भान हरपून शाडु मातीच्या श्री गणेशाच्या मूर्ती साकारणाऱ्या या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कला कौशल्याला मा.आमदार राजेश मोरे, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांनी देखील मनापासून दाद दिली.




इंडिया बुक ऑफ रेकॉड्स आणि OMG बुक ऑफ रेकॉड्स यांनी घेतली या कार्यशाळेची दखल

पर्यावरण पूरक श्री गणेशोत्सव साजरा व्हावा, जास्तीत जास्त नागरीकांनी पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करावी आणि शालेय विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती स्थापनेची भावना रुजवावी, म्हणून "हरित बाप्पा, फलित बाप्पा" या संकल्पनेवर आज या कार्यशाळेचे आयोजन आज केले असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली.

या कार्यशाळेमध्ये क्षितीज गतीमंद शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील अतिशय उत्कृष्ठ श्री गणेश मूर्ती आपल्या हातानी साकारल्या.

यापूर्वी बंगलोर येथील पोल्यूशन कंट्रोल बोर्ड यांचा एकुण 3,308 पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती बनविण्याचा जागतिक विक्रम महापालिकेच्या आजच्या या कार्यशाळेत मोडीत निघाला असून, आजच्या या कार्यशाळेत एकुण 4,657 विद्यार्थ्यांनी श्री गणेश मूर्ती साकारल्याने याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉड्स आणि OMG बुक ऑफ रेकॉड्स या बुकमध्ये घेतली असल्याचे इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसच्या सीमा मानीक्कोथ आणि OMG बुक ऑफ रेकॉड्सचे डॉ.दिनेश गुप्ता यांनी घोषीत केल्यामुळे महापालिकेच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

ही कार्यशाळा सकाळी 08.30 ते दुपारी 01.00 या वेळेत संपन्न झाली. सहभागी विद्यार्थी, महापालिकेचे अधिकारी कर्मचारी आणि शाळांचे शिक्षक मिळून एकुण 5245 जणांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली. याचीही दखल OMG बुक ऑफ रेकॉड्स यांनी घेवून घोषीत केल्याची माहिती या कार्यशाळेच्या प्रकल्प प्रमुख आणि पर्यावरण विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती रोहिणी लोकरे यांनी दिली.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, मुख्य लेखा परिक्षक सुरेश बनसोडे, उपआयुक्त संजय जाधव, समिर भुमकर, वंदना गुळवे, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, सहा. आयुक्त प्रिती गाडे, हेमा मुंबरकर, राजेश सावंत यांनी उपस्थित राहून, विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. तसेच मूर्तीकार सचिन गोडांबे, मिनल लेले, शेखर ईश्वाद, संतोष जांभुळकर, गुणेश अडवळ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शाडुच्या श्री गणेश मूर्ती बनविण्यासाठी मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा यशस्वी होण्याकरीता पर्यावरण प्रदुषण नियंत्रण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे व त्यांच्या विभागातील सहकारी तसेच एज्युकेशन टुडे फांऊडेशनचे भरत मलिक व वृंदा भुस्कुटे यांनी अथक परिश्रम घेतले.

# 'शोध अभियांत्रिकी मनाचा' समारंभात सेवाभावी अभियंता जीवन पाटील यांचा गौरव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : "शोध अभियांत्रिकी मनाचा" हा गुणगौरव समारंभ मंगलवार पेठेतील सिंचन भवन सर विश्वेश्वरय्या सभागृह पुणे येथे अत्यंत उत्साहात आणि मोठ्या दिमाखात पार पडला. या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी भूषवले.

कार्यक्रमात ग्रंथ प्रकाशन, लेखक अभियंत्यांचा सत्कार, उत्कृष्ट अभियंता पुरस्कार, गुणवंत पाल्यांचा गौरव, प्रबोधनपर व्याख्याने, अभियंता मित्र मासिकाचा ३९ वा वर्धापन दिन, तसेच स्व. मोतीलालजी धूत आणि स्व. प्रभाकर गानू शिष्यवृत्ती प्रदान असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.




या सोहळयात, पेण येथील सामाजिक कार्यकर्ते तसे बृहन्मुंबई महानगरपालिका मध्ये उत्कृष्ट अभियंताचे काम केल्याने जीवन शंकर पाटील यांचा सेवाभावी अभियंता म्हणून मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य विकासकर्मी अभियंता डॉक्टर कमलाकांत वडेलकर यांनी विशेष करून जीवन पाटील यांच्या कार्याचा गुणगौरव केला व त्यांनी केलेल्या पाणी खात्यातील योगदानाबद्दल तसेच सन २०१९ मध्ये कोल्हापूर आणि सांगली येथे आलेल्या पूरस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची विशेष नोंद घेण्यात आली.या प्रसंगी मुंबईचा पाणीपुरवठा व जलवाहिनी दुरुस्ती याबाबतची पुस्तिका, डॉ. श्रीपाल सबनीस आणि श्री दिनकर गोजारे (मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका) यांना प्रदान केली.

कार्यक्रमाला समारंभाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस प्रमुख उपस्थिती अँड पुरुषोत्तम खेडेकर, संस्थापक मराठा सेवा संघ दिनकर गोजारे मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका युवराज देशमुख – मुख्य अभियंता(निवृत्त) योगेश भोसले – कनिष्ठ अभियंता, पुणे महानगरपालिका विकास कर्मी "अभियंता मित्र" मासिकाचे संपादक व समारंभ प्रमुख डॉ. कमलकांत वडेलकर ,प्रवीण पाटील विजय मोकल तसेच साहित्य, अभियांत्रिकी आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, अभियंते, विद्यार्थी आदि उपस्थित होते.

# दहा हजाराची लाच घेताना महिलेला रंगेहाथ अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : महाराष्ट्र शासनाचे राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत उमेद अभियान योजनेत समुदाय व्यक्ती म्हणून मानधनावर काम करीत असलेल्या तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे मानधन उमेद कार्यालय,वाडा, जि. पालघर येथून निघत असते. तक्रारदार यांना १९ हजार आठशे रुपये रक्कमेचा मानधन चेक मिळालेला असून त्यामधून उमेद कार्यालयातील महिला लोकसेवक रेणुका रणवीर आत्राम, (वय ३०) या लाच मागणी करीत असलेबद्दल तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर युनिट येथे तक्रार दाखल केलेली होती.

त्या अनुषंगाने सोमवारी (दि.११ ऑगस्ट) केलेल्या कायदेशीर पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे मानधन चेक काढून दिल्याबद्दल मोबदला म्हणून १० हजार रक्कमेची लाच मागणी करून ती स्विकारली आहे. नमूद लोकसेवक रेणुका रणवीर आत्राम यांना लाच स्विकारली असताना रंगेहात पकडून ताब्यात घेण्यात आलेले आहे. याप्रकारणी वाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परीक्षेत्रचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक, सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, संजय गोवीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-अधीक्षक लाचलूचपात विभाग पालघर, दादाराम करांडे, पोलीस निरीक्षक राकेश डांगे, पोलीस निरिक्षक राकेश डांगे, हवालदार विलास भोये, योगेश धारणे, नवनाथ भगत, प्रकाश दळवी, पोलीस अंमलदार गीता कहार, आकाश लोहारे, जितेंद्र गवळे यांनी सापळा रचून कारवाई केली आहे.

पालघर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची, बक्षीशीची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलूचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालय यांच्याशी दुरध्वनी क्रमांक 02525/297297 व टोल फ्रि क्रं. 1064 संपर्क साधान्याचे आवाहन पो.उप.अधीक्षक दादाराम करांडे यांनी केले आहे.

# गीतासार



## अध्याय १८

## मोक्षसंन्यासयोगः

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् । सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ १८-४८ ॥

म्हणूनच हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), सदोष असले तरीही स्वाभाविक कर्म सोडून देऊ नये. कारण धुराने जसा अग्नी, तशी सर्व कर्मे कोणत्या ना कोणत्या दोषाने युक्त असतात. ॥ १८-४८ ॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः । नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ १८-४९ ॥

सर्वत्र आसक्तिरहित बुद्धी असलेला, निःस्पृह आणि अंतःकरण जिंकलेला मनुष्य सांख्ययोगाने त्या श्रेष्ठ नैष्कर्म्यसिद्धीला प्राप्त होतो. ॥ १८-४९ ॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे । समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ १८-५० ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), जी ज्ञानयोगाची अंतिम स्थिती आहे, त्या नैष्कर्म्यसिद्धीला ज्या रीतीने प्राप्त होऊन मनुष्य ब्रह्माला प्राप्त होतो, ती रीत थोडक्यात तू माझ्याकडून समजून घे. ॥ १८-५० ॥

### रेसिपी

# पालक कॉर्न पकोडा



पालक हा पौष्टिक भाज्यांमधील एक आहे. आणि आपण पालक पनीर ,आलू पालक असे पदार्थ मुलांना आवडतील अशा चवीचे बनवत असतो. पण ह्या पदार्थांव्यतिरिक्त काहीतरी अजून चटपटीत खाण्याची इच्छा मुलांना नेहमी असते. त्यामुळे चटपटीत पण आणि पौष्टिक पण अशी रेसिपी आज आपण बघणार आहोत. जो पदार्थ आपण मुलांना डब्यात हि देऊ शकतो. आणि मुलंही हा पदार्थ आवडीने खाऊन डबा संपवतील.तर आपण त्या पदार्थाची रेसिपी आणि कृती बघुयात.

**साहित्य**

पालक - 1 कप,कॉर्न - 1/2 कप बेसन - 1/2 कप,तांदळाचे पीठ - 2 ते 3 चमचे,चिरलेला कांदा - 1/2,हिरवी मिरची - 1 ते 2 आले-लसूण पेस्ट - 1 चमचा हळद - 1/4 चमचा,धणे पूड - 1/2 चमचा.मीठ.तेल

**कृती**

एका भांड्यात चिरलेला पालक, वाटलेले कॉर्न, बेसन, तांदळाचे पीठ, चिरलेला कांदा, हिरवी मिरची, आले-लसूण पेस्ट, धणेपूड, लाल तिखट, हळद आणि चवीनुसार मीठ मिक्स करून घ्यावे.मिश्रणात गरजेनुसार पाणी घ्या.पीठ जास्त पातळ आणि घट्ट होणार नाही याची काळजी घ्यावी.दुसरीकडे कढईत तेल गरम करण्यास ठेवावे.तेलात हव्या त्या आकारात पकोडे तळून घ्यावेत.अशा पद्धतीने तयार झाले आहेत पालक कॉर्न पकोडे.

### अंबाडी तालुका निर्मितीसाठी

# रेणुका विद्यालय झिडके येथे विचार विनिमय सभा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : गेल्या अनेक वर्षांपासून भिवंडी तालुक्याचे विभाजन होऊन अंबाडी नवीन तालुका निर्मिती होण्यासाठीचे प्रयत्न आजपर्यंत यशस्वी झालेला नाहीत. यासंबंधी राज्य शासनाकडून सन-1992/94 मध्ये तत्कालीन विभागीय कोकण आयुक्त जी.बी.पिंगुळकर यांच्या एक सदस्यीय समितीकडून अहवाल सादर करून घेतलेला आहे,परंतु शासनाकडून या अहवालाची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही,त्यामुळेच या भागाचा विकास संपूर्णतः थांबलेला आहे. एकंदरीत या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा असा दृष्टीकोन असणारे सामाजिक क्षेत्रातील नेतृत्वाचा अभाव असल्यामुळेच येथील नागरिकांचे दुर्भाग्य आहे, असेच म्हणावे लागेल यात शंकाच नाही.

परंतु या महत्वपूर्ण विषयाकडे "माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी तालुका" यांच्या माध्यमातून जानेवारी 2025 पासुन पाठपुरावा सुरूवात झाली आहे,त्याकरिता राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,व महसूलमंत्री यांच्याकडे प्रत्येक्ष भेटी -गाठी घेऊन या संबंधात पाठपुरावा केलेला आहे, एवढेच नाहीतर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून तात्काळ अंबाडी तालुका मंजुरीबाबत महासंघाच्या निवेदनावर आजमितीस "अप्पर नवीन अंबाडी तालुका " निर्मितीसाठी तत्वतः मान्यता दिली आहे. तेव्हापासून " माहिती अधिकार महासंघ " विविध स्वरूपातील प्रयत्नातून आपल्या ग्रामीण भागातील सर्वसामान्यांबाबत सामाजिक जाणीवेतून तन,मन,धन या भावनेने नवीन अंबाडी तालुका निर्मितीसाठी आपले योगदान देत आहेत.या कामी नवीन तालुका निर्माण होण्यासाठी एकूण-48 ग्रामपंचायतीकडून ठराव मंजूर करून आपली कर्तव्यदक्ष भावना बजावलेली आहे, अशा ग्रामपंचायतींचा सरपंच/उपसरपंच यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार समारंभ करण्यासाठी आणि पुढील तालुक्याच्या संबंधात कामकाजाचे नियोजन करण्याबाबत रविवार दिनांक-10 ऑगस्ट 2025 रोजी दुपारनंतर ठीक-2.30 वाजता "रेणुका विद्यालय झिडके,ता. भिवंडी येथे" नागरिकांची विचार विनिमय व नियोजन सभा आयोजित करण्यात आली होती.या सभेस मार्गदर्शन करण्यासाठी सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी बी.बी.ठाकरे,व तालुका निर्मितीचे प्रमुख मार्गदर्शक सु.ल.पाटील यांची उपस्थिती प्रामुख्याने होती.तर सभामंचकावर प्रमुख पाहुणे म्हणून इरफान भुरे, शरद पाटील, पंकज गायकवाड, आत्माराम पाटील, विकास जाधव,संजय पाटील,कैलास जाधव,दशरथ पाटील,अनंता पाटील, चंद्रकांत भोईर,सी.एस्.पाटील, कॉ.रमेश जाधव,आर. जी.पाटील, पत्रकार-कुसूम देशमुख, शिवाजी राऊत ,विनोद पाटील आदिंची उपस्थिती होती. यापैकीच काही मान्यवरांनी उपस्थित सरपंच/उपसरपंच तसेच जनसमुदाय यांना मार्गदर्शन केले. या मान्यवरांपैकी बी.बी.ठाकरे यांनी नवीन अंबाडी तालुका निर्मितीबाबत प्रशासकीय स्तरावरील हवे ते सहकार्य करण्याची ग्वाही यावेळेस देण्यात आली.




यानंतर सदर सभेचे अध्यक्ष पत्रकार-विजय गायकवाड यांच्या मनोगतातून आजपर्यंत तालुका निर्मितीसाठी " माहिती अधिकार महासंघाचे" योगदान आणि करीत असणारे प्रयत्न आदि सर्व मुद्द्यांवर विवेचन करून,आपली महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली.सदर विचार-विनिमय सभा आयोजित करण्यामागे मोलाचा सहभाग आणि मेहनत करणारे महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आत्माराम पाटील,नवसु पाटील, विजय गायकवाड, शामराव भोईर,डी.बी.पाटील,आर.जी.पाटील, रमेश गायकवाड, सदाशिव रोठे, बबन तनपुरे, सिताराम भोसले, प्रिया भोईर, शकीला शेख इत्यादी.

सदर सभेचे प्रास्ताविक शामराव भोईर व सूत्रसंचालन प्रदीप जाधव यांच्याकडून करण्यात आले.एकंदरीत नवीन अंबाडी तालुका निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असणारे माहित अधिकार महासंघ यांच्या अव्हानात्मक चळवळीला तमाम जनमानसातून " संघर्ष समिती" रूपाने साथ मिळणार असल्याने शासन दरबारी याबाबत नक्कीच न्याय मिळेल असा आशावाद येथील उपेक्षित भागातील तमाम नागरिक करीत आहेत.

# 'होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्कर्स' पदासाठी रोजगाराची सुवर्णसंधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड: शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील युवक-युवतींना इस्त्राईल देशात "होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्कर्स" या क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली आहे. तसेच पहिल्या टप्प्यात सुमारे 5000 युवक-युवतींना संधी मिळणार आहे. याकरिता जिल्ह्यातील युवक-युवतींनी अधिक माहिती व नोंदणीसाठी https://maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट देवून अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीम.अ.मु.पवार यांनी केले आहे.









**मेष**

अभ्यास आणि अध्यापनाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे. तुम्हाला लवकरच मोठे यश मिळणार आहे.तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**वृषभ**

दिवस आनंदात व्यतीत कराल. तुम्हाला तुमच्या मुलाकडून एखादी चांगली बातमी मिळेल.मन प्रसन्न राहील. शैक्षणिक कार्यात यश मिळेल.

**मिथुन**

वैवाहिक जीवन चांगले राहील.काही खेळांमध्ये भाग घेऊ शकता. व्यवसाय करणाऱ्यांना व्यवसाय वाढवण्याची सुवर्णसंधी मिळेल.

**कर्क**

अनावश्यक खर्च टाळावा.कामाच्या ठिकाणी कामात काही नवीन कल्पना आणाल. तुमच्या सकारात्मक वृत्तीमुळेच तुम्हाला नोकरीत बढती मिळेल.

**सिंह**

व्यावसायिकांसाठी दिवस चांगला आहे.या काळात तुमचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न कराल.नोकरीत पदोन्नती तसेच उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या**

लेखन इत्यादी कार्यातून तुमचा मान-सन्मान वाढेल. कामाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांशी सुसंवाद राखाल. प्रगतीच्या संधी मिळतील.

**तूळ**

व्यवसायाशी संबंधित प्रवास करावा लागेल. तुम्हाला काही अनुभवी लोक भेटतील. ज्यामुळे तुम्हाला भविष्यात फायदा होईल. चांगला नफा मिळेल.

**वृश्चिक**

अपेक्षेपेक्षा जास्त लाभ होण्याची शक्यता आहे. कार्यालयात सहकाऱ्यांशी चांगला समन्वय राहील. वरिष्ठ तुमच्या कामावर खूश होतील.

**धनु**

कौटुंबिक जीवन खूप आनंददायी असणार आहे. तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही तयार असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुंदर समन्वय राहील.

**मकर**

तुम्ही तुमच्या कठोर परिश्रम आणि सकारात्मक वर्तनाने कठीण परिस्थितीतून बाहेर पडाल. पैशाच्या व्यवहारात थोडे सावध राहा.

**कुंभ**

जुन्या जमिनीच्या मालमत्तेतून तुम्हाला चांगला नफा मिळेल. सरकारी क्षेत्रात चांगली नोकरी मिळेल. तुम्ही आणि तुमचे कुटुंब खूप आनंदी व्हाल.

**मीन**

बढती मिळण्याची शक्यता आहे. तुमचा पगारही वाढू शकतो. कामाच्या ठिकाणी शहाणपणाने घेतलेले निर्णय तुम्हाला चांगले परिणाम देतील.




# आज डोंबिवलीत पाणी नाही

## तातडीच्या देखभाल दुरुस्तीसाठी पाच तासांचा शटडाऊन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याण डोंबिवली पालिकेकडून डोंबिवली पूर्व, पश्चिम शहराला होणारा पाणी पुरवठा बुधवारी (ता. १३ ऑगस्ट) तातडीच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी दुपारी एक ते संध्याकाळी सहा या वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेच्या डोंबिवली विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी घेतला आहे.

डोंबिवली शहराला उल्हास नदी काठच्या मोहिली येथील उदंचन केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. हे पाणी कल्याण पश्चिमेतून बैलबाजार, गोविंदवाडी, पत्रीपूल भागातून रेल्वे मार्गाखालून नेतिवली येथील टेकडीवरील जलशुध्दीकरण केंद्रात आणले जाते. उल्हास नदीतून उचललेले हे कच्चे पाणी नेतिवली येथील जलशुध्दीकरण केंद्रात शुध्द करून मग डोंबिवली पूर्व, पश्चिम शहराला पुरवठा केले जाते.

पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत. उल्हास खोऱ्यातून डोंगर दऱ्यातून वाहत आलेला गाळ, पालापाचोळ नदीतून वाहत असतो. उल्हास नदीकाठी कल्याण पश्चिमेत मोहिली येथे हे पाणी कल्याण डोंबिवली पालिका शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी उचलते. हे पाणी कच्चे असते. पाणी उंदचन केंद्रात सयंत्रातून गाळून घेताना अनेक वेळा तांत्रिक समस्या निर्माण होतात. सतत उचलण्यात येणाऱ्या पाण्यातील गाळ, पालापाचोळ्याचा निचरा करताना उंदचन केंद्रातील सयंत्रे जाम होतात. काही वेळी ती बंद पडतात. त्यामुळे या केंद्रावर अवलंबून असणारे नेतिवली येथील जलशुध्दीकरण केंद्र पालिकेकडून बंद ठेवण्यात येणार आहे. यामुळे डोंबिवली पूर्वेतील पाथर्डी, ठाकुर्ली, चोळे, ९० फुटी रस्ता, भोईरवाडी, पेंडसेनगर, सारस्वत कॉलनी, गोग्रासवाडी, अयोध्यानगरी, फडके रस्ता परिसर, सुनीलनगर, आयरे रस्ता, राजाजी पथ, म्हात्रेनगर, डोंबिवली रेल्वे स्थानक परिसर, डोंबिवली पश्चिमेतील विष्णुनगर, मोठागाव, ठाकुरवाडी, कोपर, शास्त्रीनगर, जयहिंद कॉलनी, सुभाष रस्ता, नवापाडा, कुंभारखाणपाडा, देवीचापाडा, उमेशनगर, चिंचोड्याचापाडा, गणेशनगर, रेल्वे वसाहत परिसर, भागशाळा मैदान परिसराला होणारा पाणी पुरवठा बुधवारी बंद राहणार आहे. पालिकेकडून सोसायटीला पाणी पुरवठा होण्याच्या वेळेत हा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पुरेसा पाणी साठा करून देण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

# केडीएमटीच्या फेऱ्या वाढवा - भाजपाची मागणी

### भाजपा माजी शहर अध्यक्ष वरुण पाटील यांचे केडीएमसी आयुक्तांसह परिवहन व्यवस्थापकांना पत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणमधील दुर्गाडी - बिर्ला कॉलेज रोड दरम्यान चालणाऱ्या रिंग रूट परिवहन बसेसच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे माजी शहरअध्यक्ष तथा माजी नगरसेवक वरुण पाटील यांनी केडीएमसी आयुक्त आणि परिवहन व्यवस्थापकांकडे पत्राद्वारे केली आहे. कल्याण रेल्वे स्थानकाहुन दुर्गाडी बिर्ला कॉलेज रोड दरम्यान चालणाऱ्या परिवहन बस सेवेच्या फेऱ्या अत्यंत मर्यादित आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना, शालेय विद्यार्थी, नोकरदार, वयोवृद्ध यांना दररोज प्रवास करताना अडचण होत आहे. सध्या दररोज सुरु असलेल्या फेऱ्या अनियमित सुरू असून त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. परिणामी लोकांना खाजगी वाहतुकीवर अवलंबून राहावे लागते, जे अनेकांसाठी खर्चिक आणि असुविधाजनक आहे. तरी नागरिकांच्या सोयीसाठी या मार्गावरील बस फेऱ्यांची संख्या वाढवावी, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय टळेल अशी मागणी भाजपाच्या वतीने वरुण पाटील यांनी केली आहे.


## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जुना एस.टी. स्टॅण्ड, कापआळी, भिवंडी ४२१ ३०२, जि.ठाणे
TEL: 02522-55314/55315, FAX: 02522-52074

**बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्रं.१**
**ई-निवीदा सुचना क्रमांक : ५९ सन २०२५/२६**
**(जनरल निधी सन २०२५-२६)**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक - १३/०८/२०२५ ते दिनांक - २८/०८/२०२५ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
| --- | --- | --- | --- |
| १ | प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्रं. ३ गायत्रीनगर मधिल सुहास निकम यांचे घरापासुन ते रमेश निकम यांचे घरापर्यंत गटार व पाथवेज बनविणे | ९,९९,८०४/- | २३६०/- |

वरील ऑनलाईन निविदा दि.२८/०८/२०२५ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदा ही दि.२९/०८/२०२५ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोई प्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
(जमिल पटेल)
शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जावक क्रमांक : जसंवि/८६३
दि. १२ ऑगस्ट २०२५


# शहापूरातील राघोजी भांगरे यांच्या समाधीस्थळाची दुरवस्था



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : इंग्रजांच्या जुलमी सत्तेविरोधात देशव्यापी संघर्ष पुकारणारे आणि सह्याद्रीचा सिंह अशी ओळख असलेले आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे यांची शहापूर तालुक्यातील त्यांच्या उभ्रई गावातील समाधी स्थळाची अत्यंत दुरवस्था झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या समाधीची किमान डागडुजी तरी शासनाने करावी अशी मागणी येथील स्थानिक आदिवासी समाजाकडून केली जात आहे. मात्र याकडे सरकार सातत्याने दुर्लक्ष करत असल्याने आता शहापूर मधील नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली त्यांच्या समाधी स्थळाची वाईट अवस्था झाल्याने सर्वच स्तरांतून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

शहापूर तालुका हा ठाणे जिल्ह्यातील १००% पेसा अधिनियमांतर्गत येणारा अनुसूचित क्षेत्र आहे. त्यामुळे येथे आमदार, सभापती, सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती अशी सर्व राजकीय पदे १००% आदिवासी समाजासाठी आरक्षित आहेत. हा तालुका डोंगर-दऱ्या, नद्या, धरणे, समृद्ध जैवविविधता आणि आदिवासी सांस्कृतिक परंपरेने नटलेला आहे. सध्या तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांचे दर्शन घडते. या तालुक्यातील ही जैवविविधता पाहण्यासाठी आणि याचा अनुभव घेण्यासाठी प्रामुख्याने पावसाळ्यात आणि हिवाळ्यात इतर जिल्ह्यांतून पर्यटक शहापूरमध्ये आवर्जून येतात. तर अनेकांचे या तालुक्यात शेतघरे देखील आहेत.

मात्र याच आदिवासी बहुल जिल्ह्यातील आदिवासी नागरिकांच्या हक्कांसाठी इंग्रजांविरोधात लढा देणारे क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या समाधीस्थळाकडे मात्र सरकार आणि स्थानिक प्रशासनकडून गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने दुर्लक्ष करण्यात आल्याने समाधीस्थळाची पुरती दुरवस्था झाली असून फक्त काही खडक या ठिकाणी समाधी स्थळाच्या ठिकाणी शिल्लक राहिले आहेत. यामुळे आदिवासी समाजासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करणाऱ्या श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातुन नुकतेच याबाबत आंदोलन देखील करण्यात आले. तर समाधीकडे प्रशासनाने गांभीर्याने घेतले नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देखील संघटेनच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

### हर घर तिरंगा अभियानांतर्गत

# अंबरनाथ नगरपरिषदेतर्फे भव्य बाईक रॅली



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ दि.12** – 'हर घर तिरंगा २०२५' या उपक्रमाच्या औचित्याने आज अंबरनाथ नगरपरिषदेतर्फे भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. देशभक्तीच्या घोषणांनी दुमदुमलेल्या या रॅलीत नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले.

रॅलीची सुरुवात नगरपरिषद मुख्यालयातून करण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गांवरून जाताना सहभागी सदस्यांनी हातात तिरंगा घेऊन नागरिकांना राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचे आवाहन केले. रॅलीदरम्यान देशभक्तिपर गीतांमुळे वातावरण देशभक्तीने भारून गेले.

मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाचा उद्देश स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवण्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवणे हा होता. नागरिकांनी रॅलीचे स्वागत टाळयांच्या गजरात करत देशभक्तीची भावना व्यक्त केली.

# आठवड्याऐवजी महिन्याभराची औषधे एकदाच

### क्षयरोगाच्या निर्मूलनासाठी पनवेल महापालिकेची दिलासादायक संकल्पना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** - पनवेल महापालिकेमध्ये सोमवारी राष्ट्रीय क्षयरोग (टीबी) दूरीकरण कार्यक्रमाचा आढावा पालिका आयुक्तांनी घेऊन टीबी मुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी या बैठकीत महत्वाच्या सूचना वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना दिल्या. या सूचनांमध्ये टीबी रुग्णांना यापुढे आठवड्याऐवजी महिन्याची एकदाच औषधे महापालिकेच्या आरोग्य विभागाने द्याव्यात तसेच क्षयरोग रूग्णांपर्यंत महापालिकेचे आरोग्य विभाग लवकर पोहचण्यासाठी खाजगी रूग्णालयांनी तसेच धुंकी, रक्त व लघवी तपासणी करणा-या प्रयोगशाळा चालकांनी (लॅब) क्षयरोग रुग्ण तसेच संशयित रूग्णांची महापालिकेकडे नोंदणी करण्यासाठी संबंधित आस्थापनांना पत्राने तातडीने कळवा असा सूचना आयुक्तांनी केल्या.

पनवेल महापालिकेच्यावतीने टीबी मुक्त भारत अभियानाची अमंलबजावणीसाठी सोमवारी पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत अति जोखीमग्रस्त क्षय रूग्णांना उपचाराखाली आणून क्षयरोग निमुर्लन करण्याच्या दृष्टीने विविध उपायांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी टीबी फोरमचे उपाध्यक्ष प्रसेनजित कारलेकर, सचिव मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, जागतिक आरोग्य संघटनेच्या ठाणे मंडळाच्या सल्लागार डॉ. ज्योती साळवे, माजी नगरसेवक डॉ. अरूण भगत, इंडीयन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गुणे, बालरोग तज्ज्ञ डॉ. जय भांडारकर, एमजीएम क्षयरोग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रदीप पोतदार, मधुमेह तज्ज्ञ डॉ. कीर्ती समुद्र, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, पालिका वैद्यकिय अधिकारी उपस्थित होते.

# पावसाने दडी मारल्याने उरणच्या पाणी पुरवठ्यावर परिणाम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : गेल्या पंधरा दिवसापासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे रानसई धरण वाहने बंद झाले आहे. याचा परिणाम धरणातील भविष्यातील पाणी पुरवठ्यावर होणार आहे. त्यामुळे उरणकरांच्या पाणी पुरवठ्यावर याचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावर्षी मे महिन्यातील अवकाळी पावसामुळे जून महिन्याच रानसई भरून वाहू लागले आहे. रानसई धरणाची साठवणूक क्षमता घेटल्याने उरणच्या नागरिकांना नोव्हेंबर महिन्या पासूनच पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. ही समस्या अधिक गंभीर होऊ लागली आहे. मात्र पावसाळ्यात चार महिने होणाऱ्या पावसामुळे धरणात पाणी पातळी कायम राहण्यास मदत होते. मात्र गेल्या पंधरा दिवसापासून पावसाने दडी मारल्याने धरणातील ओसंडून वाहणारे पाणी बंद झाले आहे. उरणचा मोठ्या प्रमाणात औद्योगिक व नागरी विकास सुरू आहे. त्यामुळे सद्य स्थितीत दररोज ५० ते ६० एमएलडी पाण्याची गरज आहे. मात्र रानसई धरण आणि पुनाडे धरणाची क्षमता तेवढी नाही. या दोन धरणांच्या पाणीसाठ्यावर अवलंबून राहिल्यास तालुक्याला फक्त तीन ते चार महिनेच पाणीपुरवठा होऊ शकतो. त्यामुळे तालुक्यातील पाण्याची गरज भागविण्यासाठी सिडकोचे हेटवणे धरण आणि एमजेपीचे बारवी धरणातील पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे. परिणामी उरण तालुक्यातील नागरिकांवर नवीन पाण्याचे स्रोत शोधण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येत आहे.

# बाप्पाच्या आगमनासाठी उल्हासनगर पालिका सज्ज

### आधुनिक मास्टिक डांबराने शहरातील खड्डेमुक्त मोहिमेला गती






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : अवघ्या काही दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाचे औचित्य साधून उल्हासनगर महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या आदेशानुसार उल्हासनगर महानगरपालिकेकडून आधुनिक मास्टिक डांबरचा वापर करून प्रभागनिहाय खड्डेमुक्त मोहिम राबविली जात आहे. आधुनिक टेक्नॉलॉजिचा वापर करून प्लास्टिक डांबरातून रस्ते भरण्याच्या प्रक्रियेला महापालिका प्रशासनामार्फत सुरूवात करण्यात आली आहे. मास्टिक अस्फाल्ट हा डांबराचा प्रकार असून २०० डिग्रीमध्ये उकडून घेत आहेत. त्यानंतर खडीवर चार थर करून रस्त्यावरील खड्डयांत टाकले जाते. त्यामुळे डांबराचा थर घट्ट होऊन तो वॉटर प्रुफ होतो. मास्टिकमुळे अवघ्या दोन तासांत वाहने रस्त्यावरून धावू शकणार आहेत.

प्रभाग समिती क्र. १ ते ४ मध्ये मास्टिक अस्फालटन डांबरातून मुख्य रस्ते व चौकांचे डांबरीकरण, पॅचिंग आणि दुरूस्तीची कामे युध्दपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश मा. महापालिका प्रशासक तथा आयुक्तांनी दिले आहेत.

त्यानुसार प्रभाग समिती १ व ४ मधील दादा कमल पारवानी मार्ग, सिध्दी विनायक नगर, चोपडा कोर्ट, गोल मैदान परिसर, छत्रपती शाहु महाराज उड्डाण पूल येथील खड्डे भरण्यास सुरूवात झाली आहे. टप्याटप्याने सर्व प्रभागांत खड्डे भरण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रमुख चौक व मुख्य रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी यंत्रणा युध्दपातळीवर कामाला लागली आहे. अशी माहिती सहा. आयुक्त (१) तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी प्रसिद्धिपत्रकामार्फत दिली.

# मुंबई विमानतळाच्या नामकरणाची अधिसूचना जाहीर न केल्यास आरपारचा लढा देऊ

### - विमानतळ नामकरण समिती अध्यक्ष दशरथ पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : राज्याच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर होऊन नवी मुंबई विमानतळाला नाव देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला आहे. या संदर्भात केंद्रीय विमानन मंत्र्यांनी वारंवार नावाचा एकच प्रस्ताव असल्याचे जाहीर केले आहे. मात्र विमानतळ सुरू होण्याच्या तयारीत असतांनाही नावाची अधिसूचना का? जाहीर केला जात नाही. याबद्दल आता शंका वाटू लागली असून येत्या पंधरा दिवसात नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणाची अधिसूचना जाहीर न केल्यास पुन्हा एकदा संघर्ष आणि आरपारचा लढा सुरू केला जाईल अशी माहिती सर्व पक्षीय नवी मुंबई विमानतळ नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली आहे. गेल्या दोन वर्षांपासून नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणाच्या वादाचे घोंगडे भिजत पडले आहे. पावसाळी अधिवेशनात लोकसभेतील शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांनीच फक्त 'दिबां'च्या नावासाठी आवाज उठविला आहे. त्यामुळे आता नामकरणाचा संघर्ष अधिक पेटण्याआधी लवकरच येत्या २१ ऑगस्ट ला सर्वपक्षीय बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली.

# ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय जागांवर अनधीकृत बांधकामांचा सुळसुळाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोईसर** : तारापूर औद्योगिक क्षेत्राजवळील ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय जागांवर अनधीकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे. वाढत्या अनधीकृत बांधकामांमुळे परिसरात बकालपणा वाढला असून या ठिकाणी राहणाऱ्या हजारो नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा पुरविताना प्रशासनाची दमछाक होत. अनधीकृत बांधकामांवर कारवाईसाठी स्थानिक नागरीकांकडून महसूल विभागाला अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा कारवाई होत नसल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रालगत सरावली, बोईसर, खैरेपाडा, बेटेगाव, मान, कोलवडे, सालवड, पास्थळ या ग्रामपंचायत हद्दीत मागील काही वर्षापासून महाराष्ट्र शासनाकडून प्रकल्प बाधितांना वाटप, वन, गायरान, आदिवासी आणि शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, समाज मंदीर या सारख्या सार्वजनिक सोयी सुविधांसाठी राखीव जागांवर अतिक्रमण करीत मोठ्या प्रमाणात अनधीकृत इमारती, चाळी आणि गोदामे बांधण्याचे काम सुरु आहे. जिथे मोकळी जागा दिसेल तिथे अनधिकृत बांधकामे उभी केली जात आहेत. बोईसर परिसरात अवधनगर, शिवाजी नगर, धनानी नगर, गणेश नगर सारख्या मोठ्या झोपडपट्ट्या उभ्या राहिल्या असून यातील बहुतांश घरे ही प्रशासनाची अधिकृत परवानगी न घेता शासकीय जागांवर अतिक्रमण करून उभारण्यात आली आहेत.






# बविआला दुसरा धक्का ■ हितेंद्र ठाकुरांचे निकटवर्तीय महेश पाटलांच्या हाती कमळ




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई** : बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर यांचे निकटवर्तीय मानले जाणारे माजी नगरसेवक महेश पाटील यांनी मंगळवारी भाजप मध्ये प्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून ते नाराज होते. सक्रीय राजकारणापासून ते अलिप्त होते. मात्र अचानकपणे त्यांनी भाजपशी घरोबा केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

वसई विरार शहरात आगामी महापालिका निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांतराला सुरवात झाली आहे. भाजपाने आपली मोर्चेबांधणी सुरू केली असून विविध पक्षातील प्रमुख नेते व कार्यकर्ते आपल्याकडे वळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

मंगळवारी बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक महेश पाटील यांनी काही स्थानिक कार्यकर्त्यांसह भाजप मध्ये प्रवेश केला. त्यात राजेश ठाकूर, सविता ठाकूर, रवी पाटील, राजेश पाटील, दिलीप भोईर, हर्ष म्हात्रे, धवल सतीश चोरघे, जन्मेजय प्रजापती, संदीप फाटक यांचा समावेश आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते हा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी आमदार स्नेहा दुबे पंडित, आमदार राजन नाईक, भाजप जिल्हाध्यक्षा प्रज्ञा पाटील यासह भाजपचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# 'हर घर तिरंगा' निमित्त शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /वाडा : 'हर घर तिरंगा' उपक्रमानिमित्त वाड्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी तिरंगा हाती घेऊन प्रभात फेरी काढली. देशभक्तिपूर्ण घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी गावाच्या प्रमुख रस्त्यांवरून फेरी काढून नागरिकांना राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचे आवाहन केले. या प्रभात फेरीत शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य तसेच ग्रामस्थांनीही सहभाग घेतला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा इतिहास, तिरंग्याचे महत्त्व व त्याचा सन्मान याबाबत मार्गदर्शन केले. देशभक्तीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**विद्यार्थ्यांनी गावाच्या प्रमुख रस्त्यांवरून फेरी काढून नागरिकांना राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचे आवाहन केले.**



### जीवनदीप महाविद्यालय म्हसा येथे
## मंगळागौरी व श्रावणसरी काव्यवाचन कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

म्हसा : दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग आणि महिला विकास मंच(WDC) मार्फत श्रावण मास निमित्त मंगळागौरी व श्रावणसरी (काव्यवाचन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रावण महिना हा हिंदू पंचांगातील पाचवा महिना असून तो 'सणांचा राजा' म्हणून ओळखला जातो आणि या महिन्यात विविध सण-उत्सव साजरे केले जातात, तसेच उपवास आणि पूजा-अर्चा करण्याला विशेष महत्त्व आहे. याच अनुषंगाने महाविद्यालयात मंगळागौरी व श्रावणसरी (काव्यवाचन) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये श्रावण मास बद्दल जागरूकता निर्माण व्हावी या



उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. योगेश माळी सर यांच्या शुभहस्ते गणेशपूजन करून कर्यक्रमाची सुरुवात झाली त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापिकांनी मंगळागौरी कलशपूजन केले. प्राचार्य माळी सर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या नंतर प्राचार्य माळी सरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना श्रावण मास बद्दल माहिती दिली त्यानंतर श्रावणसरी या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांनी कविता वाचन करून यात उत्स्फूर्त सहभाग घेतला, त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिकांनी देखील कविता वाचन, गायन तसेच मनोगत व्यक्त करून सहभाग नोंदवला. यानंतर विद्यार्थिनींनी मंगळागौरी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख स. प्रा. विजय सोनार, स. प्रा. तनुजा देसले (सदस्य -सांस्कृतिक विभाग), महिला विकास मंच (WDC) प्रमुख स. प्रा. दिक्षा बोटकुंडले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले. सर्वच विभागातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. एकूणच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आनंदमय वातावरणात कार्यक्रम पार पडला.

### एसटी चालक-वाहकांसाठी
## मोफत छाती एक्स-रे कॅम्प

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : एसटी कर्मचाऱ्यांचे कार्य सतत प्रवास, धूळ आणि अनियमित आहाराशी संबंधित असल्यामुळे अनेकदा आरोग्याच्या समस्या उद्भवतात. जिल्ह्यातील काही चालक-वाहक टीबीचे रुग्ण आढळल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी विभाग नियंत्रकांशी भेटून टीबी प्रतिबंधासाठी ही मोहीम राबविण्याची गरज व्यक्त केली.

श्री. घोडे यांनी टीबीमुक्त रायगड अभियानात एसटी विभागाचे योगदान महत्वाचे असल्याचे सांगत सर्वांनी मोफत एक्स-रे तपासणी करून घ्यावी, तसेच प्रत्येक आगारात नियोजनबद्ध कॅम्प आयोजित करावेत, अशा सूचना दिल्या.

या मोहिमेत अलिबाग आगारात 179 आणि पेण आगारात 70 कर्मचाऱ्यांचे एक्स-रे करण्यात आले. यापैकी सहा जणांचे नमुने ट्रूनाट मशीनवर तपासण्यात आले असून सर्व रिपोर्ट निगेटिव्ह आले आहेत. पेणसह रायगड जिल्ह्यातील सर्व एसटी आगार व कार्यशाळांमधील चालक, वाहक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी मोफत छाती एक्स-रे कॅम्प आयोजित करण्याचे आदेश विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी दिले आहेत. जिल्हा क्षयरोग विभाग, रायगड-अलिबाग यांनी संपूर्ण जिल्ह्यातील चालक व वाहकांनी या तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे




ज्ञान व वैराग्यविना भक्ती दृढ होत नसते आणि सफल ही होत नसते ज्ञान व वैराग्य यांचे दान गंगा देत असते. भक्ती मार्गाचा महिमा हाच आहे की जोपर्यंत परमेश्वराचा साक्षात्कार होत नाही तोपर्यंत भक्त असे मानत असतो की, माझ्याच दोषांमुळे भगवंत मला भेटत नाहीत. भक्तीने दैन्यभाव निर्माण होतो. ज्ञानमार्गात योगी ब्रह्मरूप होतो पण अहंकार वाढतो - उत्पन्न होतो. म्हणून बहुतेकांचे पतनही होते.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862

## ठाणे महापालिकेच्या भरती कक्षाची महापालिका आयुक्तांकडून पाहणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगरपालिका आस्थापनेवरील गट-'क' व गट-'ड'मधील रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया सुविहीतपणे चालावी यासाठी ठाणे महापालिका मुख्यालय येथे भरती कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षाची पाहणी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मंगळवारी केली. भरतीसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. या हेल्पलाईनचे नियोजन या कक्षातून केले जात आहे. हेल्पलाईनवर येणाऱ्या फोनवर सविस्तर उत्तर देणे, त्याची नोंद ठेवणे, इमेलवर आलेल्या प्रश्नांना तत्काळ उत्तर देणे ही कामे कक्षातून करण्यात येत आहेत. हेल्पलाईनवर संपर्क साधणाऱ्यांना व्यवस्थित माहिती दिली जावी, अशी सूचना पाहणीनंतर आयुक्त सौरभ राव यांनी केली. या पाहणीसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी.जी. गोदेपुरे, महिला व बालविकास अधिकारी दयानंद गुंडप आदी उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिका आस्थापनेवरील गट-'क' व गट-'ड'मधील रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रशासकीय सेवा, लेखा सेवा, तांत्रिक सेवा, अग्निशमन सेवा, शिक्षण सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा, निमवैद्यकीय सेवा आदी सेवांमधील एकूण १७७३ पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी दि. ०२ सप्टेंबर, २०२५ या काळात केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज करता येणार आहेत. त्याची लिंक ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत / तपशिल तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच, संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा / वयोमर्यादा शिथिलता, निवड पध्दत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक, समांतर आरक्षण, तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क, अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशिल ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येईल.

हेल्पलाईन क्रमांक जाहिरातीमधील बाबींसंबंधी विचारणा करण्यासाठी ०२२-२५४१५४९९ हा हेल्पलाईन क्रमांक तो कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सोमवार ते शुक्रवार स. १०.३० ते सायं. ५.३० यावेळेत सुरू राहील. त्याचप्रमाणे, tmcrecruitment2025@gmail.com येथे इमेलही करता येईल.

त्याचबरोबर, अर्ज भरणे, परीक्षा शुल्क तसेच प्रवेशपत्र याबाबत काही तांत्रिक समस्या उद्भवल्यास महापालिकेने ०२२-६१०८७५२० हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिला आहे.

### श्रीराम मित्र मंडळाच्या मानाच्या
## दहीहंडी उत्सवात पाच लाखांची पारितोषिके

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : वासिंद येथील श्रीराम मित्र मंडळाची आयोजित दहीहंडी उत्सव हा शहापूर तालुक्यातील मानाची दहीहंडी उत्सव मानला जात असून यंदा मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा आदी विविध उपक्रम व मदतीपर कार्य राबविण्यात येत आहेत. यंदाही मंडळाच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन येथे करण्यात आले आहे.

सदर, उत्सवात एकूण पाच लाखांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्व. दमयंती मानिवडे यांच्या स्मरणार्थ प्रथम पारितोषिक व आकर्षक चषक असून यामध्ये पाच ते आठ थरांच्या सलामी मंडळांना रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात येणार आहेत तर बाळ गोपाळांसाठी आपल्या कलेसह वेशभूषा स्पर्धा आयोजित असून यामध्ये मोठा, मध्यम व लहान गट आहेत. तसेच यासाठी स्व. सोमनाथ देवरे, स्व. संदीप सुपडू पाटील व स्व. मधूकर सोनार यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम देण्यात येणार असून विजेत्यास विशेष रोख पारितोषिक व चषक आणि सहभागी प्रत्येक स्पर्धकास आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असून यावेळी प्रेषक महिला भगिनींसाठी आकर्षक पैठणी लकी ड्रॉ असल्याचे मंडळाचे अध्यक्ष अनिल मानिवडे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, या उत्सवाला सुप्रसिद्ध अभिनेत्री स्नेहल अहिरे यांची उपस्थिती लाभणार असून सर्वांनी या उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

## पडघ्यातील कुंभेरेश्वर महादेव मंदिरात महाआरती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : शिव भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या मुबई नाशीक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील पडघा येथील प्रसिद्ध कुंभेरेश्वर महादेव मंदीरात विविध साधुसंताच्या उपस्थितीत महाआरती संपन्न झाली.

हिन्दु धर्मासाठी पवीत्र असलेल्या श्रावण महिन्यातील श्रावणी सोमवारचे औचित्य साधून सकल हिन्दु समाजाच्या वतीने मंहत शिवरुपांनंद स्वामी याच्यां मार्गदर्शनाखाली कुंभेरी नदीकिनारी स्थित कुंभेरेश्वर महादेव मंदीरात



अभिषेक व महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हिन्दु धर्माचे देशातील नामवंत साधु, संत, अलोकनाथ महाराज तानसा, योगी अशोकनाथ महाराज हिमालय, विजयनाथ महाराज मांढरादेवी, योगी ब्रहस्पतीनाथ दिल्ली, शंकरनाथ महाराज मावळ, औधड रमेशनाथ गिरीधारी, मंहत संजीवन गिरीमहाराज नेपाळ, बालयोगी भोईर महाराज, अंनता बाबा बंगाली उपस्थीत होते. यावेळी उपस्थीत साधू, संतानी हिन्दु धर्म आणि हिन्दुच्यां धार्मिक स्थळांवर इतर धर्मीयांचे होणारी अतिक्रमणे याबाबत उपस्थीतांना मार्गदर्शन करुन आयोध्येतील राम मंदीराची उभारणी हा हिन्दु धर्माचा मोठा विजय असल्याचे सांगितले. तर यावेळी महतं शिवरुपांनंद स्वामी यांनी कुंभेरेश्वर महादेव मंदीराच्या नवीन बांधकामाची माहीती दिली. तर यावेळी महाआरतीसाठी शिवसेना नेते प्रकाश पाटील, आमदार शांताराम मोरे, उद्योजक पंडीत पाटील सह संदीप भगत, वैभव महाडीक, रूपेश भोईर, जगदीश पाटील, कार्तिक यशवंतराव, राहुल चंदे व परिसरातील नागरीक उपस्थीत यावेळी नागरीकांना प्रसाद, शितपेयांचे वाटप करण्यात आले.

## रक्षाबंधन निमित्त प्रवासी बंधूकडून एसटीला कोटींची ओवाळणी

### - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : यावर्षी रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांमध्ये प्रवाशांनी तुडुंब भरलेले एसटीमधून महामंडळाला १३७.३७ कोटी रुपयांची उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टला एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी एसटीला रक्षाबंधन आणि भाऊबीज (दिवाळी ) या दोन दिवसात विक्रमी उत्पन्न मिळत असते. कारण, या दिवशी भाऊ बहिणीकडे किंवा बहिण भावाकडे असे प्रवासी दळणवळण मोठ्या प्रमाणामध्ये होते. परिणामी गेली कित्येक वर्ष रक्षाबंधनच्या सणाच्या कालावधी एसटीला त्या वर्षातील विक्रमी उत्पन्न मिळत आले आहे. यंदा रक्षाबंधन आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एसटीला प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. रक्षाबंधनच्या आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३०.०६ कोटी रुपये रक्षाबंधन दिवशी ३४.८६ कोटी व दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी ३३.३६ कोटी रुपये तर सोमवारी तब्बल ३९..९ कोटी इतके विक्रमी उत्पन्न एसटीला मिळाले. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने ४ दिवसात १ कोटी ९३ लाख प्रवाशांनी एसटीमधून सुरक्षित प्रवास केला आहे. त्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या तब्बल ८८ लाख आहे.

रक्षाबंधन सणानिमित्त एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवाशांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल एसटी महामंडळाचे अध्यक्ष व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आभार मानले आहेत. तसेच आपल्या घरी सण असून देखील कर्तव्याला प्राधान्य देत अत्यंत मेहनतीने काम करुन विक्रमी उत्पन्न आणणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.


## भिवंडीत दोघांची निर्घृण हत्या
### भाजपा युवा मोर्चा उपाध्यक्ष मयत..

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील खारबाव चिंचोटी रस्त्यावरील खर्डी या गावात दोघा युवकांवर अनोळखी मारेकऱ्यांनी प्राणघातक शस्त्रांनी हल्ला करून हत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.त्यामुळे परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन नोंद घेत गुन्हा दाखल केला आहे.

प्रफुल्ल तांगडी व तेजस तांगडी असे हल्ल्यात मयत झालेल्या युवकांची नावे आहेत.प्रफुल्ल तांगडी भाजपा युवामोर्चा उपाध्यक्ष पदाधिकारी असुन जागा खरेदी विक्री व्यवसायिक म्हणून काम करीत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी रात्रीच्या सुमारास प्रफुल्ल आपला सहकारी तेजस यांच्या सोबत खार्डी गावातील जे.डी.टी. इंटरप्रायसेस या आपल्या कार्यालयात बसला होता.रात्री ११ वाजताच्या सुमारास दोघे घरी जाण्या साठी निघत असतानाच दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी प्राणघातक शस्त्रांसह हल्ला चढवला. या हल्ल्यात वर्मी घाव बसल्याने दोघे ही रक्ताच्या थारोळ्यात जागेवरच गंभीर जखमी अवस्थेत गतप्राण





**दरम्यान उमेश तांगडी याने दिलेल्या तक्रारी वरून भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात विकी भरत म्हात्रे, कल्पेश रामदास वैती, अजय सुरेश तांगडी, महेंद्र नामदेव तांगडी, दयानंद नामदेव तांगडी, सुनिल सुभाष भोईर, प्रसाद गजानन तांगडी, मोहन बाळकष्ण तांगडी, नऊस नरेश नांदुरकर, विजय एकनाथ मुकादम, रवींद्रएकनाथ मुकादम व जितेश मधुसुदन गवळी अशा १२ जणांविरोधात तक्रार दिल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

झाले.झालेल्या घटनेची माहिती भिवंडी तालूका पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेऊन शहरातील स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला आहे. रूग्णालयात भाजप आमदार महेश चौघुले, माजी नगरसेवक संतोष शेट्टी,भाजपा जनता युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष देवेश पाटील,सुमित पाटील,माजी सरपंच श्रीधर पाटील यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सात्वन केले.पोलिस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी यांनी सीसीटीव्ही कॅमेरे व घटनास्थळाची पाहणी करून मारेकऱ्यां विरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.दरम्यान गावात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे.आमच्या भाजपा परिवारातील चांगला कार्यकर्ता व सुजाण माणूस आम्ही गमावला आहे.पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून तातडीने आरोपींना अटक करावीअशी प्रतिक्रिया भाजपा जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष देवेश पाटील यांनी दिली आहे..**

## दि अभिनव सहकारी बँक लिमिटेडचे गौरवशाली सुवर्ण महोत्सवी वर्ष




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली: अभिनव सहकारी बँक डोंबिवली 1976 ला स्थापन झाली असून 2025 ला पन्नास वर्षे पूर्ण होत आहे या निमित्ताने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली.

संचालक मंडळाने दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रथम बँकेतील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांनी दहावी , बारावी, पदवी, आणि पदव्युत्तर परीक्षेत 80 टक्के पेक्षा जास्त मार्क मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. दरम्यान बँकेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सी.ई.ओ. सुरेश मोहन शिंदे बँकेचे सर्व कामकाज पाहत असून धोरणात्मक निर्णय, सेवापद्धती ,तंत्रज्ञान, या बाबींवर त्यांचे लक्ष असते शिंदे यांचे कुशल नेतृत्व, अत्यंत शिस्तबद्ध काम करण्याची पद्धता यामुळे प्रगतीला हातभार लागतो. यावेळी अध्यक्षीय भाषणात रमेश रतन पाटील म्हणाले की बँकेची आर्थिक परिस्थिती उत्तम असून बँक सातत्याने . A. क्लास ऑडिट श्रेणी मध्ये आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे

**वसुली व थकीत कर्जाचे निर्लेखन :**

**गतवर्षी अखेर बँकेच्या ढोबळ एन पी ए चे प्रमाण ६.६९ टक्के व एन पी ए चे प्रमाण १.७७ टक्के एवढे होते अहवाल वर्ष अखेर त्यात घट होऊन ढोबळ एन पी ए चे प्रमाण प्रमाण ४.९७ टक्के व निव्वळ नफा ०.०० टक्के आहे ही बाब अत्यंत उल्लेखनीय आहे. थकीत कर्ज वसुलीचे प्रयत्न सातत्याने व कसोशीने करण्यात येत आहेतच. सर्वच थकीत कर्ज खात्याच्या वसुलीसाठी प्रत्यक्ष भेटी, पाठपुरावा, कायदेशीर कारवाई इत्यादी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. अहवाल वर्षी कोणत्याही थकीत कर्जाचे निर्लेखन करण्यात आलेले नाही** Financially Sound And Weel Managed ( FSWM ) **आपणा सर्वास कळिवण्यास अभिमान वाटतो की, बँकेने सुवर्ण महोत्सवी वर्षात रिझर्व बँकेचे नियमानुसार द्वितीय वर्ष २०२४ - २०२५ मध्ये नाही** Financially Sound And Weel Managed. ( FSWM) **चे सर्व निकष पूर्ण केले आहेत. आपल्या बँकेने आजवर जी उत्तम प्रगती केली आहे याचे हे प्रमाण आहे व उत्तर उत्तर आपण अशीच प्रगती करू हा विश्वास आहे.**

R.B.I. द्वारे "financility sound" म्हणून मान्यता प्राप्त आहे. अध्यक्ष पुढे म्हणाले की हे यश सर्व संचालक मंडळ, अधिकारी वर्ग, आणि कर्मचारी यांच्या योगादानानेच मिळाले असेच सहकार्य पुढे मिळू घ्या.

अध्यक्ष भाषांतर सभा संपल्यावर अध्यक्ष रमेश रतन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बँकेकडून केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सर्व अधिकारी कर्मचारी यांनी रमेश पाटील यांना केक भरवून वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या.

## कर्करोगविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पश्चिमेतील भाऊराव पोटे माध्यमिक विद्यालय येथे कर्करोगविषयी जागृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थी आणि पालक मेळाव्याचे मंगळवारी आयोजन करण्यात आले. यावेळी, इयत्ता आठवी ते दहावीतील १५० विद्यार्थ्यांसह पालक उपस्थित होते. पल्स हॉस्पिटलमधील स्त्री रोग तज्ञ डॉ. ऋतू पराग मिसर, इन्नर व्हील कल्ब ऑफ कल्याण डायमंड्सच्या अध्यक्षा डॉ. तृप्ती बोबडे, डॉ. विसपुते आणि पोटे ग्रुप ऑफ एज्युकेशनचे सीएमडी बिपीन पोटे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| क्र. | अभ्यासक्रम | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११९२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.